दै. पुण्यनगरी दि. 08/07/2023

# मोबाईल व मोटार सायकल चोरटे २४ तासाच्या आत जेरबंद

पुण्यनगरी दि 08/07/2023

## भाग्यनगर पोलिसांची कार्यवाही

**नांदेड/प्रतिनिधी**

शहरतील वाडी बु.येथील निसर्ग धाबा अॅन्ड फॅमिली रेस्टॉरन्ट समोरुन दुचाकी व रुममधील मोबाईल असा एकुण ५० हजारांचा ऐवज चोरट्याने लंपास केला होता. भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने एका दिवसात या चोरट्याला जेरबंद केले आहे.

दि. ३ जुलै २०२३ रोजी निलेश रंगराव पावडे रा.वाडी बु ता.जि.नांदेड यांची निसर्ग बार अॅन्ड फॅमीली रेस्टॉरन्ट समोर ठेवलेली एम.एच. २६ बी.एफ क्रमांकाची ३० हजार रुपये किंमतीची स्प्लेंडर व तसेच रुममध्ये जावुन २० हजार रुपये किंमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने लंपास केला. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात २५६/२३ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधिक्षक अविनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव पोलीस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांच्या मार्गदर्शनाखाली भाग्यनगर गुन्हे शोध पथकातील सहा. पोलीस निरीक्षक संगमनाथ परगेवार, पोहेकॉ किशोर हुंडे, पोना बालाजी चत्रे, पोकॉ कांबळे यांनी आरोपीच्या मोबाईलचे लोकेशन हेरले. आरोपी वेळोवेळी लोकेशन बदलत असल्याने त्याचा पाठपुरावा केला.

आरोपीचा शिताफीने शोध घेवून नाशिक येथून गुरुवीरसिंघ दिलबागसिंघ, (२३, व्यवसाय नोकरी, रा. चिच्या ता. जि. अमृतसर पंजाब) यास अटक केले. आरोपीकडुन चोरी केलेला २० हजारांचा मोबाईल व ३० हजारांची स्प्लेंडर मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे.

# अट्टल गुन्हेगाराला एमपीडीए लावला

**नांदेड/ प्रतिनिधी**

शहर व परिसरात खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी उकळणे यासारख्या गुन्हेगारी कारवाया करणाऱ्या सुदाम उर्फ भुन्या दिनाजी जोंधळे या कुख्यात गुन्हेगाराला पोलिसांनी एमपीडीए लावला आहे.

शहरातील इतवारा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रितीनगरमध्ये राहणारा सुदाम ऊर्फ भुन्या दिनाजी जोंधळे याच्याविरुध्द इतवारा व इतर पोलिस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न, खंडणी उकळणे, दरोडा, जबरी चोरी यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. या आरोपीला एका गुन्ह्यात शिक्षाही झाली आहे. जेलमधून जामिनावर बाहेर आल्यानंतर त्याने पुन्हा गंभीर गुन्हे सुरु केले आहेत.तसेच पोलिसांनी प्रतिबंधक कारवाई करुनही त्याच्या वागण्यात फरक पडत नसल्याने त्याच्याविरुध्द स्थानबध्द (एमपीडीए) प्रस्ताव तयार करून जिल्हादंडाधिकारी नांदेड यांच्याकडे सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाला नांदेडच्या जिल्हादंडाधिकाऱ्यांनी दि.३० जून २३ रोजी मंजुरी दिला. त्यांच्या आदेशाने सुदाम ऊर्फ भुन्या दिनाजी जोंधळे याला अटक करून औरंगाबाद जिल्हा कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे. हा प्रस्ताव तयार करण्यासाठी पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक,तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी, तत्कालीन पोलिस निरीक्षक, स्थागुशाचे पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पथक व इतवारा ठाण्याच्या गुन्हे शोध पथकतील कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. या कारवाईमुळे शहरातील वाढत्या गुंडगिरीवर नियंत्रण मिळण्याची शक्यता आहे.